**Experiential, participative, problem solving through participation in Hackathon competitions**

AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING, SANGAMNER
DEPARTMENT OF COMPUTER ENGINEERING

## HACKATHON PARTICIPATION DETAILS

| Sr. No. | Academic Year | Hackathon and Organizer | Date | Participant List along with mentor | Title Project | Achievement if any |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 2015-16 | ----- | -- | -- | -- | -- |
| 2. | 2016-17 | Smart India Hackathon, MHRD Place: | 02 – 03 April 2017 | Mr. Amit Gunja<br>Mr. Shiv Kumar Khurana<br>Mr. Sujeet Yadav<br>Ms. Yogita Shinde<br>Mr. Shirish Kadam<br>Mr. Mayur Wadekar<br>Mentor:<br>Prof. K.U.Rahane<br>Prof. S.B.Bhonde | IRIS Attendance for Daily wages | -- |
| 3. | 2017-18 | Smart India Hackathon 2018, MHRD, AICTE, GOI<br>Place:- JSS Academy Noida | 30th -31st March,2018 | Paras Waykole<br>Harshal Sakhare<br>Vaibhav Sharma<br>Rajat Patil<br>Kalyani Shinde<br>Priyanka Bokand<br>Mentor:-<br>Prof. V.K. Abhang<br>Prof. A.S.Thorat | Job Portal for Assam Goernment | 2nd Runner Up Prize Rs. 50,000/- |
| 4. | 2017-18 | Smart India Hackathon 2018, MHRD, AICTE, GOI<br>Place:- College of Engineering, Pune | 30th -31st March,2018 | Om Khandve,<br>Shraddhesh Jungade,<br>Yash Agrawal,<br>Aniruddha Kote,<br>Abhishek Nagare,<br>Sujit Dengale | Women Safety Band | -- |

Prof. R. L. Paikrao
Head of Department

HEAD OF THE DEPARTMENT
(COMPUTER ENGINEERING)
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
SANGAMNER - 422608

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Mentor: Prof. M. S. Tamboli | | |
| 5. | 2019-20 | Smart India Hackathon 2018, MHRD, AICTE, GOI<br>Place:- Chitakara University Chandigad<br><br>DRDO, GOI | 01st to 3rd Aug,2020 | Team- ORCA<br>Rohan Kulkarni<br>Tejas Bidwai<br>Vijay Chaudhari<br>Vinay Gupta<br>Purva Chandage<br>Ishwari Kadav<br>Mentor:<br>Prof. K.U.Rahane<br>Prof. S.B.Bhonde | Indoor Navigation System | 1st Prize<br>Rs. 1 Lakh |
| 6. | 2019-20 | Smart India Hackathon 2018, MHRD, AICTE, GOI<br>Place:- KL University , Vijaywada<br><br>Central Water Commision, Ministry of Jal Shakti | 01st to 3rd Aug,2020 | Team- Code Brigade 1.0<br>Pragati Sahane<br>Harshada Rodage<br>Komal Kerulkar<br>Chhaya Sonawane<br>Atharv Hase<br>Nagesh Amone<br><br>Mentor:-<br>Prof. V.K. Abhang<br>Prof. M.B.Gunjal | Water accounting in irrigation commands through crowd sourced crop mapping | -- |
| 7. | 2019-20 | Hackathon e-war Against Covid-19<br>PDA College of Engineering, Gulbarga & MHRD, GOI | 27th -28th April,2020 | Team- Amrut<br>Tushar Gopale<br>Vrushali Kadam<br>Prasad Deshmukh<br>Rushikesh Amale<br>Ajay Kanawade<br>Mentor- S.B.Bhonde | An intelligent chatbot to detect fake message of corona virus on whatsapp | 1st Prize<br>Rs. 25,000/- |

Prof. R. L. Paikrao
Head of Department

HEAD OF THE DEPARTMENT
(COMPUTER ENGINEERING)
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
SANGAMNER - 422608

दि. ११-४-२०१८ | प्रवरा तीर | दैनिक प्रवरातीर हेल्पलाईन (०२४२५) २२७३९९ | Email: dainikpravarateer01@gmail.com | ३

# भारत सरकारच्या स्मार्ट इंडिया हॅकथॉन स्पर्धेत अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांचे यश

संगमनेर (प्रतिनिधी) - -**ICTE** आणि **HRD** मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट इंडिया हॅकथॉन २०१८ हि जगातील सर्वात मोठी डिजिटल उपक्रम स्पर्धा ३० व ३१ मार्च २०१८ रोजी संपूर्ण देशात संपन्न झाली. देशातील २८ मध्यवर्ती केंद्रात हि स्पर्धा घेण्यात आली. २७ केंद्रीय मंत्रालय आणि १७ राज्य सरकार यांच्या दैनंदिन कामात येणारे अडथळे सोडवण्यासाठी ९०० आव्हाने सादर करण्यात आली ,त्यातील ३४० आव्हाने निवडण्यात आली . ३४० आव्हाने व त्यावरील सोलुशन(उपाय) विद्यार्थ्यांनी शोधून काढले. २८ मध्यवर्ती केंद्रावर दि. ३० व ३१ मार्च २०१८ रोजी स्पर्धा घेण्यात आली. ह्या स्पर्धेसाठी अमृतवाहिनीच्या दोन संघांची निवड करण्यात आली होती. द्वितीय विजयी संघ यांनी आसाम सरकारसाठी जॉब पोर्टल तयार केले. सलग ३६ तास प्रोग्रामिंग करत ह्या संघाने तृतीय पारितोषिक रोख रक्कम ५००००/- मिळवले. हि स्पर्धा जे एस एस अकादमी नोएडा येथे संपन्न झाली. ह्या विद्यार्थ्यांना प्रा. विक्रम अभंग व प्रा. अभिनव थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघातील विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे : १. पारस वायकोळे (संघ प्रमुख ) २. रजत पाटील ३. हर्षल साकरे ४. वैभव शर्मा ५. प्रियांका बोकन्ड ६. कल्याणी शिंदे. एका संघाने महिलांच्या सुरक्षेसाठी हातातील सुरक्षा कवच विद्यार्थी नाविन्यपूर्ण या अंतर्गत संकल्पना सादर करण्यात आली.



द्वितीय वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी हे सॉफ्टवेअर तयार केले. हि स्पर्धा अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे संपन्न झाली. प्रा. मुबीन तांबोळी व प्रा. परशुराम शिंगोटे यांनी मार्गदर्शन केले. स्मार्ट इंडिया हॅकथॉन २०१८ स्पर्धे मध्ये घवघवीत यश मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री आ. श्री. बाळासाहेब थोरात साहेब, विश्वस्त डॉ. सुधीरजी तांबे, संचालक मा. श्री. इंद्रजीत भाऊ थोरात, विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख आणि कार्यकारी अधिकारी श्री. अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, उपप्राचार्य प्रा.ए.के. मिश्रा, डॉ. एम . आर . वाकचौरे ( डीन अकॅडेमिक्स) , रजिस्ट्रार प्रा. विजय वाघे, विभाग प्रमुख प्रा.राहुल पाईकराव यांनी अभिनंदन केले.

Prof. R. L. Paikrao
Head of Department
HEAD OF DEPARTMENT (COMPUTER ENGINEERING)
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
SANGAMNER - 422608

AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING, SANGAMNER
DEPARTMENT OF COMPUTER ENGINEERING

सार्वमत

# अमृतवाहिनी अभियांत्रिकीचे घवघवीत यश

## विद्यार्थ्यांनी बनविले आसाम सरकारसाठी जॉब पोर्टल



स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेत अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक पटकविला. धनादेशासह विद्यार्थी व संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, रजिस्ट्रार प्रा. विजय वाघे आदी.

**संगमनेर (प्रतिनिधी)** - ICTE आणि HRD मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्मार्ट इंडिया हॅकथॉन २०१८ ही जगातील सर्वात मोठी डिजिटल उपक्रम स्पर्धा ३० व ३१ मार्च २०१८ रोजी संपूर्ण देशात संपन्न झाली. देशातील २८ मध्यवर्ती केंद्रात ही स्पर्धा घेण्यात आली. २७ केंद्रीय मंत्रालय आणि १७ राज्य सरकार यांच्या दैनंदिन कामात येणारे अडथळे सोडविण्यासाठी १०० आव्हाने सादर करण्यात आली. त्यातील ३४० आव्हाने निवडण्यात आली. ३४० आव्हाने व त्यावरील सोलुशन (उपाय) विद्यार्थ्यांनी शोधून काढले. या स्पर्धेसाठी अमृतवाहिनीच्या दोन संघांची निवड करण्यात आली होती.

द्वितीय विजयी संघ यानी आसाम सरकारसाठी जॉब पोर्टल तयार केले. सलग ३६ तास प्रोग्रामिंग करत या संघाने तृतीय पारितोषिक रोख रक्कम ५० हजार रुपये मिळवले. ही स्पर्धा जे एस एस अकादमी नोएडा येथे संपन्न झाली. या विद्यार्थ्यांना प्रा. विक्रम अभंग व प्रा. अभिनव थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विजयी संघातील विद्यार्थी पारस वायकोळे (संघ प्रमुख), राज पाटील, हर्षल साबळे, वैभव शर्मा, प्रियंका बोथरा, कल्याणी शिंदे यांचा समावेश आहे.

एका संघाने महिलांच्या सुरक्षेसाठी हातातील सुरक्षा कवच विद्यार्थी नाविन्यपूर्ण या आधारित संकल्पना सादर करण्यात आली. द्वितीय वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी सॉफ्टवेअर तयार केले. ही स्पर्धा अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे पार पडली. प्रा. मुबीन तांबोळी व प्रा. परशुराम किरवे यांनी मार्गदर्शन केले.

स्मार्ट इंडिया हॅकथॉन २०१८ स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी महसूलमंत्री आ. बाळासाहेब थोरात, विश्वस्त डॉ. सुधीर तांबे, संचालक इंद्रजीत भाऊ थोरात, विश्वस्त शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, उपप्राचार्य प्रा. ए. के. मिश्रा, डॉ. एम. आर. वाकचौरे (डीन ॲकॅडेमिक्स), रजिस्ट्रार प्रा. विजय वाघे, विभाग प्रमुख प्रा. राहुल पाईकराव आदींनी अभिनंदन केले आहे.

Prof. R. L. Paikrao
Head of Department

HEAD OF THE DEPARTMENT
(COMPUTER ENGG)
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
SANGAMNER - 422608

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

०३-०५-२०२०, पान नं. २
www.yuvavarta.com
dailyyuvavarta@gmail.com

# लॉकडाऊनमध्ये अमृतवाहिनी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन हॅकॅथॉन स्पर्धेत घवघवीत यश

संगमनेर (प्रतिनिधी)- कोरोना या महामारीमुळे सर्वच जग थांबले आहे. शाळा - कॉलेज सर्वच बंद आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी देशात ऑनलाईन क्लासेस, स्पर्धा , कोर्सेस घेण्यात येत आहे. महाविद्यालय विविध उपक्रम विद्यार्थ्यांसाठी लॉकडाऊनमध्ये राबवत आहे. ह्यात अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी उत्साहाने सहभाग नोंदवत आहे. राष्ट्रीय स्थळावर ऑनलाइन हॅकाथॉन e-war against Covid-19 स्पर्धा पी.डी.ए. अभियांत्रिकी महाविद्यालय गुलबर्गा, कर्नाटक यांनी आयोजित केली. त्यात देशातील ३० संघांनी सहभाग नोंदवला. ह्या स्पर्धेमध्ये अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अमृत या संघाने प्रथम पारितोषिक २५०००/- रु. मिळाले. अमृत संघाने कोरोनाशी लढा देताना देशात व्हॉट्सअॅप या ऑपद्वारे फेक मेसेज पाठविले जातात त्यावर प्रतिबंध करण्यासाठी व अशे फेक मेसेज ओळखने यासाठी विद्यार्थ्यांनी -n intelligent chatbot to fake detect message of coronavirus on Whatsapp हे आप्लीकाशोन बनवले. सलग ३६ तास दि. २७ व २८ एप्रिल २०२० रोजी चाललेल्या स्पर्धेत अमृत संघान ऑनलाइन पद्धतीने प्रात्यक्षिक दाखवून देशात प्रथम क्रमांक मिळवला. अमृत संघामध्ये तुषार गोपळे याने संघ प्रमुख म्हणून तसेच प्रसाद देशमुख, ऋषिकेश आमले, वृषाली कदम, अजय कानवडे यांनीही विजयी सहभाग नोंदवला. ह्या संघाला प्रा. स्वाती भोंडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान शिकावे व त्याचा उपयोग देशाच्या विकासासाठी करावा, असे मनोगत प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश यांनी केले. विभाग प्रमुख प्रा. राहुल पाईकराव यांनी संघाला पुढील वाटचालीस शुभेच्छा देत बाकी विद्यार्थ्यांना लॉकडाऊनच्या काळात ऑनलाईन कोर्सेस करावे असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राज्याचे महसूल मंत्री मा. ना. बाळासाहेब थोरात, विश्वस्त आ. डॉ. तांबे, विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश यांनी अभिनंदन केले.

Prof. R. L. Paikrao
Head of Department

HEAD OF THE DEPARTMENT
(COMPUTER ENGINEERING)
AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING
SANGAMNER - 422608

AMRUTVAHINI COLLEGE OF ENGINEERING, SANGAMNER
DEPARTMENT OF COMPUTER ENGINEERING

लोकमत २५/९/२०२१

# 'अमृतवाहिनी'च्या विद्यार्थ्यांची 'हॅकथॉन'साठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**संगमनेर :** एआयसीटीई व एचआरडी मंत्रालय (दिल्ली) यांच्या संयुक्त विद्यमाने गत चार वर्षांपासून एशियन - इंडिया हॅकेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा या स्पर्धेसाठी अमृतवाहिनी शेती आणि शिक्षण विकास संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची निवड झाली आहे, अशी माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश यांनी दिली.

२७ केंद्रीय मंत्रालय व १७ राज्य मंत्रालय यांना विविध क्षेत्रात येणारी आवाहने आणि अडथळे ओळखून प्रोब्लेम स्टेटमेंट तयार केली जातात. दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे नाविन्यपूर्ण उकल व संशोधनातून उपाय शोधणे हे स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट होय.



एशियन-इंडिया हॅकेथॉन स्पर्धेसाठी निवड झालेल्या अमृतवाहिनीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश व प्राध्यापक.

उत्कृष्ट उकल व संशोधन असणाऱ्या संघाला अंतिम फेरीत सहभागी होता येते. सलग ३६ तास प्रोग्रामिंग कोडिंग चालणाऱ्या स्पर्धेतून प्रथम पारितोषिक मिळवणाऱ्या संघाला आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत सहभाग घेता येतो. अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक विभागातील रोहन कुलकर्णी व तेजस .बिडवे या विद्यार्थ्यांची सिंगापूर येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील 'एशियन - इंडिया हॅकेथॉन- २०२१' या प्रोजेक्ट स्पर्धेत निवड झाली आहे. 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२०'मध्ये 'ओरका' संघाला भारत सरकारच्या डीआरडीओ विभागाकडून एक लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळाले होते. विद्यार्थ्यांची स्पर्धेच्या विजयानंतर पर्सिस्टंट या बहुराष्ट्रीय नामांकित कंपनीमध्ये वार्षिक ८ लाख रुपयांच्या पॅकेजसह निवड झाली आहे.

यंदा स्पर्धेत म्यानमार, इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड, कंबोडिया, सिंगापूर इत्यादी देशातील स्पर्धक अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांना विभागप्रमुख प्रा. राहुल पाईकराव, प्रा. कविता रहाणे, प्रा. स्वाती भोंडे यांचे मार्गदर्शन लाभले. (वा. प्र.)

Prof. R. L. Paikrao
Head of Department